देशदूत www.deshdoot.com
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./५५/२०१८-२० आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
deshdoot deshdoot deshdoot Daily Newspaper
नाशिक | रविवार, दि. १२ जानेवारी २०२०



### चॅरिटेबल ट्रस्टच्या 'नाशिक रन-2020'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

# उपेक्षितांच्या मदतीसाठी धावले हजारो नाशिककर

**सातपूर | दि.११ प्रतिनिधी**

उपेक्षितांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने २००३ पासून. अखंडपणे सुरू असलेल्या सामाजिक बांधिलकीच्या महाकुंभात पहाटेच्या कडाक्याच्या थंडीतही सहभाग घेण्यासाठी हजारो नाशिककरांचा जनसमुदाय महात्मानगर मैदानावर ओसांडून वाहत होता. निमित्त होते 'नाशिक रन'च्या दौडचे.

नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नाशिक परिसरातील गरीब, उपेक्षित बांधवांना मदतीचा हात देऊन मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने सुविधा देण्यासाठी 'नाशिक रन' उपक्रम २००३ साली सुरुवात करण्यात आला होता. या उपक्रमाअंतर्गत १८ व्या नाशिक रनसाठी सुमारे २० हजार टी- शर्टसूची विक्री झाली असून त्यापैकी १५ हजार नागरिकांनी नाशिक रनच्या टी-शर्टसह महात्मानगर मैदानापासून ३ व ५ कि. मी. ची दौड घेतली. ही दौड कोणतीही स्पर्धा नसून, केवळ सामाजिक बांधिलकीसाठी समाजातील बांधवांनी एकत्र येऊन केलेला जल्लोष होय.



नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने काल सकाळी ७.३० वाजता घरकूल संस्थेची दिव्यांग मुलगी आदिती पाटीलच्या हस्ते ध्वज फडकवत 'नाशिक रन-२०२०'चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी 'नाशिक रन'चे संस्थापक सौमित्र भट्टाचार्य, एन. बालकृष्णन, चेअरमन एस. एच. बॅनर्जी, सरचिटणीस अनिल दैठणकर, राजाराम कासार, मोहन पाटील, एबीबीचे उपाध्यक्ष अजय गोसावी, बॉशचे उपाध्यक्ष रमेश जी. आर. प्रबळ रे तसेच मुकूंद भट, परदेशी पाहुणे जॉन ऑलिवर रॉचरी, जर्क बर्न्ड, कारस्टन म्युलर, कालोस साहा, एससी श्रीनिवासन आदींसह मान्यवर होते.

यावेळी अमेरिकेतील ट्रायथलॉन पूर्ण करून आयर्नमॅनचा किताब पटकावणारे नाशिककर महेंद्र छोरीया, प्रशांत डबरी, डॉ. अरुण गचके, सुभाष कुलकर्णी, मनीषा धात्रक यांच्या हस्ते मैदानाभोवती मशाल रन घेत क्रीडाज्योत प्रज्वलित केली.

सर्वप्रथम दिव्यांग व अपंगत्व असलेल्या मुलांच्या महात्मानगर मैदानाभोवतीच्या दौडीने 'नाशिक रन' दौडचा प्रारंभ करण्यात आला. या मुलांना सौमित्र भट्टाचार्य यांनी झेंडा दाखवला. यानंतर लहान मुले, मुली व ज्येष्ठांची दौड घेतली. त्यास मान्यवरांनी झेंडा दाखविला. जर्मनी, चायना येथून १५ ते २० परदेशी पाहुण्यांच्या टीमनेही नाशिकरची दौड घेतली. हे सर्व पाहुणे केवळ 'नाशिक रन' उपक्रमासाठी भारतात आले होते. त्यांच्या समवेत इतर परदेशी परंतु भारतात स्थायिक झालेले पाहुणेही नाशिक रनसाठी शहरात दाखल झाले होते. आपल्या चिमुकल्यांसमवेत 'नाशिक रन'चा टी- शर्ट अंगात घालत या पाहुण्यांनी संपूर्ण दौड पूर्ण केली. पाहुण्यांची उपस्थिती आकर्षणाचे केंद्र ठरली होती.

दौड सुरू होण्यापूर्वी नाशिकच्या नवीन डान्स अकादमीद्वारे वॉर्म अप डान्स व व्यायाम करून घेण्यात आला. प्रास्ताविकात चेअरमन हरिशंकर बॅनर्जी यांनी पाहुण्यांसह नाशिककर धावपटूंचे स्वागत केले व उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. 'नाशिक रन'ने आतापर्यंत ३५० प्रकल्पांना मदत केल्याचे त्यांनी नमूद केले. ध्वजारोहणानंतर मनोगत व्यक्त करताना नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सौमित्र भट्टाचार्य यांनी उपक्रमाच्या प्रवासाचा आढावा सादर करून नाशिककरांच्या वाढत्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले.

सुमारे १५ हजार नाशिककर लहान-मोठ्यांच्या उपस्थितीमुळे व वाहतुकीवर कराव्या लागणाऱ्या नियोजनामुळे निर्माण होणाऱ्या अडचणीवर तोडगा काढण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्तालयाद्वारे उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली गंगापूर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व सेवकांसह सुमारे १५० पोलिसांसह चोख बंदोबस्त ठेवला होता. वाहतूक शाखेचे ३० पोलीस ठिकठिकाणी तैनात करण्यात आले होते. यावेळी टी- शर्ट खरेदी करणाऱ्यांना लकी ड्रॉद्वारे बक्षिसे देण्यात आली.



◉ 'नाशिक रन' उपक्रमात सहभागी जनसमुदाय




◉ नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली दौड



## पहिल्यांदा मॅरेथॉनचे आयोजन

नाशिक रनचा उद्देश धावणे नसून रन फॉर हेल्प असा आहे. उपेक्षितांच्या मदतीच्या उद्देशाने घेण्यात आलेली ही धाव होय. यंदा या सोबतच 'मॅरेथॉन' रनचे आयोजन करण्यात आले होते. महात्मानगर ते सोमेश्वर असे दहा किमीचे अंतर ठेवण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये ३०० लोकांनी सहभाग नोंदवला होता. प्रथम क्रमांकाने विजयी स्पर्धकाला ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ५ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

चार गटांत झालेल्या या स्पर्धेत महिलांसाठीच्या १५ ते ३५ वयोगटात योगिता वाघ(प्रथम), दिशा बोरसे (द्वितीय), निवृत्ती धबाड (तृतीय) हे विजते ठरले तर पुरुष गटात रोहित यादव(प्रथम), सुनील कुमार (द्वितीय), रवी कुमार (तृतीय)हे विजते ठरले.

३५ ते ५० वयोगटातील महिला विभागातून अश्विनी देवरे (प्रथम), नितू सिंग (द्वितीय), निता नारंग (तृतीय) हे विजते ठरले तर पुरुष गटात सावळीराम शिंदे (प्रथम), संतोष वाघ (द्वितीय), नंदू उगले (तृतीय) हे विजते ठरले.

५० च्या वरील वयोगटातील महिला विभागातून सुचित्रा पालवे (प्रथम), कल्पना कुशारे (द्वितीय), रेवती चिटको (तृतीय) हे विजते ठरले तर पुरुष गटात हरीण चंद्र (प्रथम), वसंतराव कचरु (द्वितीय), दिनकर शेळके (तृतीय) हे विजते ठरले.

'नाशिक रन'च्या माध्यमातून प्रत्येक पैसा सामाजिक कार्यासाठी खर्च केला जात आहे. १.२५ कोटी रुपयांची मदत विविध उपक्रमांना करण्यात आली. तीन धावपटूंना २०२०च्या ऑलिम्पिक तयारीसाठी सर्वोतोपरीने मदत दिली जाणार असून, त्याचा भार नाशिक रनसह इप्कॉस टीडीके व बॉश कंपनी संयुक्तपणे उचलणार आहे. यासोबतच १५ शाळांना डिजिटल क्लास दिले आहेत. पुढे आणखी देणार. कोणत्याही पुरस्कार अथवा बक्षीस नसताना एवढे लोकं या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. हे सामाजिक कार्याच्या विश्वासार्हतेला व सहभागाच्या पुढाकारातून लोकांनी दिलेली पावतीच होय.

■ **हरिशंकर बनर्जी** (अध्यक्ष, नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्ट)

राईन हार्ट फ्लोर्ल, एन. बालकृष्णन व मी आम्ही २००३ साली स्वप्न पाहिले होते. यात राजकीय क्षेत्रापासून दूर असलेल्या समाजाला मदतीच्या रुपाने नाशिककरांची रन आयोजित करण्याचा संकल्प केला होता. आज १८ वर्षे सलग तो पूर्ण होत असलेला पाहताना समाधान वाटत आहे. आमचे हे स्वप्न पुढेही नाशिककर जिवंत ठेवतील, हा विश्वास आहे.

■ **सौमित्र भट्टाचार्य** (संस्थापक अध्यक्ष, नाशिक रन)

दरवर्षी १२ महिन्यांतून सामाजिक मदतीच्या भावनेतून महात्मानगर मैदानावर नाशिककरांचा महाकुंभ भरताना पाहून समाधान वाटत आहे. यामुळे निधी जमा करण्याचा व त्या माध्यमातून सेवा सुविधा उभारण्यासाठी उत्साह वाढतो. नाशिककरांनी असेच प्रेम टिकवावे.

■ **एन. बालकृष्णन** (संस्थापक उपाध्यक्ष, नाशिक रन )

या उपक्रमाद्वारे सामाजिक जाणीव दृढ होत आहे. या माध्यमातून परिसरातील विविध संस्थांना व गोरगरीबांना मदत उभी करून मिळत आहे. सुंदर उपक्रम आहे. सामाजिक जाणिवेसोबतच आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश देण्यासाठी रन मॅरेथॉनसारखे उपक्रम निश्चित समाजाला दिशा देणार आहे.

■ ***महेंद्र छोरीया*** *(आयर्नमॅन )*

24x7 Helpline: 0171-3055222

Scanned by CamScanner